# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-४३०-२०२४** **दिनांक - १३/११/२०२४**

## प्रेस नोट

**"Share Market App मध्ये ऑनलाईन गुंतवणुक करण्यास सांगुन फसवणुक केलेली संपुर्ण रक्कम 3,00,000/-रुपये रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात काशिगाव पोलीस ठाण्यास यश"**

----oooo----

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा परीसरात राहणाऱ्या श्रीमती दर्शना राजाराम पड्याळ यांना शेअर मार्केट मध्ये गुंतवणुक केल्यास अधिक नफा मिळविण्याचे आमिष दाखवुन आर्थिक फसवणुक झाली होती. सदर फसवणुकीच्या अनुषंगाने काशिमीरा पोलीस ठाणे गु.रजि.क्रं. ७८१/२०२३, भादंविसं.कलम ४२० सह माहीती तंत्रज्ञान(सुधारणा) अधिनियम २००८ कलम ६६(सी), ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमूद तक्रारी बाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता, तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळया बँक खात्यात वळती झाल्याचे दिसुन आले. त्या अनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम गोठविण्याबाबत संबंधीत बँकेसोबत पत्रव्यवहार करुन संशयीत खात्यामध्ये रक्कम गोठविण्यात आली. **त्यानंतर मा.न्यायालया कडुन तक्रारदार यांची रक्कम परत मिळविण्या करीता काशिगाव पोलीस ठाणेचे अधिकारी/अंमलदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या संपुर्ण रक्कम 3,00,000/-रक्कम त्यांचे खात्यावर परत मिळविण्यात** आली आहे.

### अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- **Telegram Channel, facebook, Instagram** अथवा **Watsapp** वर जास्त परतावा देणाऱ्या **Promotional Adds** वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
- अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये **Telegram Channel, Watsapp Group** वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे **Sceenshot, Massages** दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुक दारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्या ची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.
- **Work From Home** नावा खाली **Online YoutubeVedio Link Task, Hotel/Movie Rating** या सारख्या गुंतवणुक करणाऱ्या फसव्या जाहिरातींना बळी पडु नये.
- जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणाऱ्या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.
- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds** मधील गुंतवणुक करण्या अगोदर आपल्या वितीय सल्लागारा सोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.
- कोणतेही अनाधिकृत ॲप्लीकेशन डाऊन लोड करु नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करु नये.
- ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त परि-०१, मिरारोड, श्री. विजय कुमार मराठे, सहा.पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री महेश तोगरवाड, पोलीस निरीक्षक श्री. राहुल सोनवणे **तत्कालीन** नेमणुक-काशिगाव पोलीस ठाणे, पोहवा/सचिन पाटील यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

**----0000----**